## ठळक बातम्या

- महाराष्ट्रात धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी २० हजार रुपये निधी २ हेक्टरच्या मर्यादेत देण्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा
- २०२४ या वर्षाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना जाहीर
- गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब
- छत्तीसगढमधे नक्षलग्रस्त भागात झालेल्या दोन वेगवेगळ्या चकमकींमधे ३० माओवादी ठार, तर जिल्हा राखीव दलाचा एक जवान शहीद

**आणि**

- देशातले शेअर बाजार महिनाभरातल्या उच्चांकी पातळीवर, सेन्सेक्स ७६ हजार, तर निफ्टी २३ हजार अंकांच्या वर बंद

**<><><><><>**

राज्यातल्या धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर २० हजार रुपये निधी देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. जास्तीत जास्त २ हेक्टरसाठी हा निधी दिला जाईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत केली. शेतकरी कर्जमाफी संदर्भात माहिती गोळा करायचं काम सुरू आहे, असंही ते म्हणाले.

येत्या आर्थिक वर्षात १०० टक्के महसुल जमा करुन राज्याला आर्थिक शिस्त लावायची आहे. राज्याची आर्थिक परिस्थिती पाहून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढवण्याचा निर्णय घेऊ असं ते म्हणाले.

अर्थसंकल्पावरच्या चर्चेदरम्यान काही सदस्यांनी तरतुदीच्या तुलनेत अतिशय कमी खर्च झाल्याचा आरोप केला होता. तो अजित पवार यांनी फेटाळून लावला....

**होल्ड - बाईट - अजीत पवार...**

लॉटरी आणि ऑनलाइन लॉटरीच्या माध्यमातून सरकारचे उत्पन्न वाढवण्यासाठी माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याची घोषणाही त्यांनी केली.

अर्थसंकल्पातल्या वित्त, उद्योग, ऊर्जा, कामगार, खनिकर्म, ग्रामविकास, अन्न, नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण आणि नियोजन विभागाच्या अनुदानाच्या मागण्या आज विधानसभेत मंजूर करण्यात आला.

**<><><><><>**

२०२४ या वर्षाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना देण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत केली. २५ लाख रुपये, मानपत्र, मानचिन्ह, शाल असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

१०० वर्ष वयाचे राम सुतार यांनी अनेक महत्त्वाच्या व्यक्तींचे पुतळे आणि अनेक शिल्पं घडवली आहेत. केवडीया इथला स्टॅच्यू ऑफ युनिटी हा सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा, मुंबईत इंदू मिल इथल्या स्मारकातला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, सिंधुदुर्गात राजकोट इथला छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रस्तावित पुतळा यांचा त्यात समावेश आहे.

**<><><><><>**

दिशा सालियन मृत्यू प्रकरणी नव्यानं चौकशी करावी, अशी मागणी भाजपाचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी आज विधान परिषदेत केली. दिशा सालियन प्रकरणात एसआयटीची स्थापना झाली आहे, सीआयडीने याप्रकरणी क्लोजर रिपोर्ट दिला आहे. पण सत्ताधारी पक्ष या प्रकरणी सभागृहाचा वापर राजकीय हेतूसाठी करत असल्याचा आरोप विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला.

राज्याचं कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण येत्या एप्रिल महिन्यात जाहीर होईल असं, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांसाठी CBSE अभ्यासक्रमाच्या आराखड् याला सुकाणू समितीनं मान्यता दिली असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी लेखी उत्तरात दिली. या आराखड्याच्या अंमलबजावणीसंदर्भात विचार विनिमय सुरू असल्याचं ते म्हणाले.

महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार सुधारणा विधेयक कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी आज विधानपरिषदेत मांडलं. या नव्या कायद्यामुळे माथाडी कामगारांना कामगाराच्या व्याख्येतून वगळलं आहे, असं सांगत हे विधेयक पुन्हा एकदा संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावं अशी मागणी काँग्रेसचे भाई जगताप यांनी केली.

**<><><><><>**

दिशा सालियन मृत्यू प्रकरणाच्या चौकशीच्या मुद्द्यावरून आज महाराष्ट्र विधानसभेत गदारोळ होऊन कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब झालं. दिशाच्या मृत्यूच्या एसआयटी चौकशीचा अहवाल त्वरित सादर करावा आणि सामूहिक बलात्कार करून तिची हत्या झाल्याचे आरोप तिच्या

वडिलांनी काल केले होते. त्यातल्या आरोपींची चौकशी करावी, गरज असेल तर त्यांना अटक करावी अशी मागणी आमदार अमित साटम यांनी केली. या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई करू, असं आश्वासन गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिलं.

**<><><><><>**

लोकसभेत आज सरकारविरोधी घोषणा छापलेले कपडे घालून विरोधी पक्ष सदस्य सभागृहात आले होते. सभापती ओम बिरला यांनी त्याला हरकत घेतली. लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या पुनरर्चनेला विरोध दर्शवणाऱ्या घोषणा छापलेले कपडे परिधान करुन द्रमुकचे सदस्य सभागृहात आले होते. त्यांनी सभागृहाबाहेर जावं असं सभापतींनी सांगितलं, पण तसं न करता विरोधी पक्ष सदस्यांनी निषेधाच्या घोषणा दिल्या. गदारोळामुळे सभापतींनी कामकाज २ वाजेपर्यंत, आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं.

राज्यसभेत  अध्यक्ष जगदीप धनखड यांनी आधी एकदा १२ वाजेपर्यंत दुसऱ्यांदा २ वाजेपर्यंत, आणि नंतर दिवसभरासाठी कामकाज तहकूब केलं.

**<><><><><>**

छत्तीसगढमधे नक्षलग्रस्त भागात झालेल्या दोन वेगवेगळ्या चकमकींमधे ३० माओवादी ठार झाले, तर जिल्हा राखीव दलाचा एक जवान शहीद झाला.. बिजापूर आणि दंतेवाडा जिल्ह्यांच्या सीमाभागात  माओवादी लपून बसलेले असल्याची खबर मिळाल्यावरुन सुरक्षा दलांची संयुक्त पथकं शोधमोहीम राबवत होती. त्यावेळी गंगलूर भागात  ही चकमक उडाली.  या चकमकीत २६ नक्षली अतिरेकी ठार झाले. तिथं शस्त्रास्त्र आणि स्फोटकांचा मोठा साठा

सापडला आहे. या मोहिमेत सुरक्षा दलाचा एक जवानही शहीद झाला. कांकेर जिल्ह्यात सुरक्षा दलं आणि माओवाद्यांमधे झालेल्या चकमकीत ४ माओवादी ठार झाले.

**<><><><><>**

सर्व प्रकारच्या सोयी सुविधा देऊ केल्यानंतरही शरण येत नसलेल्या माओवाद्यांविरोधात सरकारचं धोरण  झीरो टॉलरन्सचंच राहील असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. सुरक्षा जवानांनी नक्षलमुक्त भारताच्या उद्दिष्टातला मोठा टप्पा आजच्या कारवाईत गाठला असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधे म्हटलं आहे. पुढच्या वर्षी ३१ मार्चपर्यंत देशातून नक्षलवादाचा बीमोड झालेला असेल असा विश्वास त्यांनी या पोस्टमधे व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

सातत्यानं होत असलेल्या तेजीमुळं देशातले शेअर बाजार महिनाभरातल्या उच्चांकी पातळीवर पोहोचले आहेत. यामुळं गुंतवणुकदारांच्या उत्पन्नात १७ लाख ४३ हजार कोटी रुपयांची वाढ झाली.  गेल्या ४ दिवसात सुरू असलेल्या तेजीमुळे सेन्सेक्स अडीच हजारांनी वधारला आहे. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज दिवसअखेर ८९९ अंकांची वाढ नोंदवून ७६ हजार ३४८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २८३ अंकांची वाढ होऊन २३ हजार १९१ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

आज जागतिक चिमणी दिन. निसर्गाच्या अन्नसाखळीतला एक महत्त्वाचा घटक म्हणजे चिमणी. पण वाढतं शहरीकरण, प्रदूषण यांचा

परिणाम चिमण्यांच्या संख्येवर होत असून हा पर्यावरणाच्या दृष्टीने धोका आहे. जागतिक चिमणी दिवसाच्या निमित्तानं मुंबई महानगरपालिका आणि नेचर फॉरएव्हर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

चिमणीच्या संरक्षणासाठी जागरुकता निर्माण करण्याच्या हेतूनं सांगली जिल्ह्यात इस्लामपूर इथं आश्पाक आत्तार या पक्षीमित्रानं अंगणात चिमण्यांसाठी घरटी बनवून तिथं त्यांच्या अन्नपाण्याची व्यवस्था केली आहे. ते राबवत असणाऱ्या उपक्रमांविषयी आश्पाक आत्तार यांनी सांगितलं...

**होल्ड बाईट - आश्पाक आत्तार...**

**<><><><><>**

महाड परिसरात भीमसृष्टीची निर्मिती करण्याची घोषणा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज केली. ते आज महाड इथं चौदार तळे सत्याग्रहाच्या ९८ व्या वर्धापन दिन कार्यक्रमात बोलत होते. यासाठी लागणारा सर्व निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली. तर, चौदार तळे सुशोभीकरणासाठी यापूर्वीच घोषीत झालेल्या ७ कोटी रुपयांची, तसंच राजर्षी शाहू महाराजांच्या स्मारकाची तीन कोटी रुपयांची कामं तातडीनं सुरू केली जातील, अशी रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी घोषणा केली.

***//<><><><><>//***